Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION
RESEARCH JOURNEY
INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL
PEER REFREED & INDEXED JOURNAL
February - 2019 SPECIAL ISSUE- 142

# Recent Trends in Language, Literature, Social Science & Commerce



**Guest Editor :**
Dr. Subhash Nikam
Principal,
Mahatma Gandhi Vidyamandir's
Karmaveer Bhausaheb Hiray Arts,
Science & Commerce College,
Nimgaon, Tal. Malegaon,
Dist. Nashik [M.S.] India

**Executive Editor of the issue :**
Dr. Arun Patil
Dr. Kalyan Kokane

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar
Yeola, Dist. Nashik (MS) India.

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned by CamScanner

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**February -2019 Special Issue – 142**

## Recent Trends in Language, Literature, Social Science & Commerce

**Guest Editor**
Dr. Subhash Nikam,
Principal,
Mahatma Gandhi Vidyamandir's
Karmaveer Bhausaheb Hiray Arts, Science & Commerce College,
Nimgaon, Tal. Malegaon, Dist. Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of the Issue**
Dr. Arun Patil
Dr. Kalyan Kokane

**Chief Editor**
Dr. Dhanraj Dhangar (Yeola)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 800/-

**Published by –**

© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258



Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013) | February-2019
Special Issue 142- Recent Trends in Language, Literature, Social Science & Commerce
UGC Approved Journal

## INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | The Impact of Mall, Call and Tall in Teaching of English Language and Literature in Rural Areas | Dr. Umesh Patil | 03 |
| 2 | New and Effective Trends and Techniques Used for Teaching and Learning English Language | Dr. Deepak Chaudhari | 06 |
| 3 | Eco-Cultural Criticism in Literary Study: A General Perspective | Ms. Deepanjali Borse | 08 |
| 4 | A Study of Element of Love and Beauty in the Poems of Dr. Vaibhav Sabnis | Deepak Deore | 11 |
| 5 | Soliloquies and Asides in Mahesh Dattani's Stage Plays | Hemantkumar Patil | 14 |
| 6 | The Role of Recent Trends in Shaping Modern English Literature | Mr. Kamalakar Gaikwad | 20 |
| 7 | Postmodern Sensibilities in K. D. Singh's Ghazals | Prof. Mukund Bhandari | 26 |
| 8 | State Level Seminar Innovative Trends in English Language Teaching | Prof. Sarbjit Cheema | 29 |
| 9 | New Wave in Dalit Literature Reflected in Narendra Jadhav's Outcaste : A Memoir | Dr. Sidhartha Sawant | 32 |
| 10 | Trends in India's Population Growth Challenges & Opportunities | Prakash Kumar | 36 |
| 11 | Business Research | Prof. Uday Teke | 40 |
| 12 | Emerging Trends in English Literature : Post 1950 | Swapnil Alhat | 43 |
| 13 | The Necessity of Incorporating Culture in to a Foreign Language Classroom | Dr. Vrushali Desai | 47 |
| 14 | संस्कृति एवं परपरा : संकल्पना एवं स्वरूप | प्रा.बाबासाहेब शेंडगे | 50 |
| 15 | मुक्तककार डॉ. गिरिराजशरण अग्रवाल | प्रा. राजाराम शेवाळे | 56 |
| 16 | आधुनिक नारी और सामाजिक चुनौतीयाँ | प्रा. आर. एन. वाकळे | 59 |
| 17 | जनसंचार माध्यमो में हिंदी भाषा की स्थिती | प्रा. कैलास बच्छाव | 61 |
| 18 | जागतिकीकरण : मराठी भाषा आणि साहित्य | डॉ. अरुण पाटील | 64 |
| 19 | साहित्यातील एक नवा रुपबंध : अलक | डॉ.प्रमोद आंबेकर | 68 |
| 20 | मराठी साहित्यातील नवे प्रवाह | डॉ. सपना सोनवणे | 74 |
| 21 | भारतातील महिला साक्षमीकरण | ज्योत्स्ना गायकवाड | 78 |
| 22 | इतिहास लेखनाविषयीचा सबाल्टर्न दृष्टीकोन | प्रा.जे.डी.पगार | 81 |
| 23 | भारतीय बँक व्यवसायातील आधुनिक तंत्रज्ञान | देवानंद मंडधरे | 84 |
| 24 | वर्तनवाद : राज्यशास्त्र विषयातील एक नवक्रांती | प्रा. एन.ए. पाटील | 90 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***



Scanned by CamScanner

# मराठी साहित्यातील नवे प्रवाह

डॉ. सपना वाल्मीक सोनवणे
कर्मवीर भाऊसाहेब हिरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
निमगाव, ता. मालेगाव, जि. नासिक.

गोषवारा :—

साहित्यविश्वात 'साहित्यप्रवाह' वेळोवेळी जन्मलेच पाहिजेत. त्यांच्या कालोचित जन्मामुळे समाजाची मानसिक प्रकृती शुद्ध आणि निरोगी, राहण्यास मदत होते. समाजमनातील अनेक सामाजिक स्तरांतील, गटांतील उपेक्षेची जाणीव, कोंडी नष्ट होते. प्रवाह नव्या जाणिवा निर्माण करतात. समाजातील हीण, घाण, दंभ, शोषण, विषमता, तटगट नष्ट करण्यास मदत करतात ते त्यांचे कालबद्ध कार्य परिपूर्ण होताच स्वतः विसर्जित होतात. त्यांचा अवतार त्या विशिष्ट कार्यासाठी असतो. समाजाच्या गरजेनुसार नवे ज्ञान निर्माण होते ते अस्तित्वात येते. ज्ञानाच्या क्षेत्रात संशोधन सततच चालते. जुने ज्ञान कालबाह्य होऊन त्याची जागा नवे ज्ञान घेते ही प्रक्रिया सतत चालते. प्रवाहांचे कार्य कालौघात निर्माण होणाऱ्या कालबाह्य जुन्या समाजरचनांना प्रतिबंध करुन त्या ठिकाणी नव्या रचना करण्यास समाजाला प्रवृत्त करणे अशाच स्वरुपाचे आहे. त्यासाठीच त्यांचा जन्म होतो. कार्यपूर्ती झाल्यावर ते विसर्जित होतात. विसर्जित होतात म्हणून खेद मानण्याचे कारण नाही कारण ते नव्यांना जागा करुन देत असतात. नव्या साहित्यप्रवाहांची उपेक्षा करुन त्यांना नामशेष करण्यापेक्षा त्यांचे स्वागत करुन ते अधिक समृध्द कसे होतील याची आत्मीयतेने डोळसपणे काळजी घेतली पाहिजे. अंतिमतः ते समाजाचा आणि साहित्याचा विकासच साधत असतात.

**साहित्यप्रवाहांच्या निर्मितीचे स्वरुप :—**

जगाचा इतिहास राजेशाहीकडून लोकशाहीच्या दिशेने प्रवास करतांना दिसतो. त्याबरोबरच जगातील ललित साहित्य हे ही राजेशाहीकडून लोकजीवनाकडे प्रवास करतांना दिसते. भारतापुरते उदाहरण घ्यायचे तर प्राचीन संस्कृत वाङ्मयात राजा किंवा राजपुत्र हेच संस्कृत वाङ्मयातील नायक दिसतात. त्यानंतर एखाद्या संस्कृत नाटकात एखादा ब्राह्मण क्वचित नायक झालेला दिसतो. मध्ययुगीन काळात संतवाङ्मयात नायक खुद्द परमेश्वरच होता पंडिती वाङ्मयही परंपरावादीच होते. ब्रिटिश आमदानीमध्ये भारताला हळूहळू लोकशाहीचा स्पर्श झाला. स्वातंत्र्योत्तर काळात जनजागृती झाली आणि त्यांच्या साहित्याचे नायक त्यांच्या समाजातून निर्माण होऊ लागले.

साहित्य हे व्यापक अर्थाने जागृत समाजजीवनाचा आरसा असते. समाज हा जसा प्रवाही आहे तसेच त्या समाजात निर्माण होणारे साहित्य हे ही प्रवाहीच असते. स्वातंत्र्योत्तर दहा— पंधरा वर्षानंतर म्हणजे १९६०—६५ च्या आसपास शिक्षण प्रसार, लोकशाही, शिक्षण सवलती व्यक्तिस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य यांचा प्रभाव पडून जनजाती कधी नव्हे ते जागृत होत होत्या त्यांना आपली मानसिक गुदमर मांडावीशी वाटत होती. हजारो वर्ष होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडाविशी वाटत होती. आधुनिक युगाचा प्रभाव पडून स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता बुद्धिवाद यांचा प्रभाव जनमानसावर पडत होता. त्यामुळे नव्या समाज रचनेची गरज वाटत होती. जुनी मुल्ये, जुने मानदंड, जुन्या दर्म कल्पना, जुन्या संस्कृतीकल्पना, जुने अर्थकारण, जुने स्तरीकरण सर्वप्रकारची जुनी विषमता यांचा जाती, पंथ, दैववाद, परंपरा इ,. जुन्या व्यवस्थांचा निकडीने आणि नव्याने विचार करण्याची गरज वाटत होती. आजवरच्या उपेक्षित लोकसागराला नव्या जाणीवांची उत्तुंग भरती येत होती. या उत्तुंग भरतीचा



Scanned by CamScanner

म्हणजेच अस्वस्थ जाणिवांचा आविष्कार म्हणजेच स्वातंत्र्योत्तर अनेक साहित्यप्रवाह होत. दलित, ग्रामीण, जनवादी, स्त्रीवादी, कामगार साहित्य हे साहित्यप्रवाह काय किंवा मुस्लिम, ख्रिश्चन, जैन यांचे साहित्यप्रवाह काय हे सर्वच समाजव्यवस्थेत कोणत्या ना कोणत्या प्रकारची कोंडी, कुंचबणा, अन्याय, शोषण, दैन्य, दुःखे, उपासमार, उपेक्षा यांच्या कैचीत कुंचबणाऱ्या लोकसमूहांचे होते.

या सर्वच साहित्यप्रवाहांना सर्वार्थाने समता हवी होती. शोषण रहित समाजरचना हवी होती. सर्व समाज एका पातळीवर एकात्म स्वरुपात हवा होता. जाती– धर्माचे प्रदेशांचे  तटगट तोडून फोडून मानवतावादी दृष्टीने शुद्ध राष्ट्रीय भावनेने प्रेरित झालेली समाजरचना हवी होती. हीच त्यांच्या निर्मितीमागची प्रेरणा होती.

**साहित्य प्रवाहाची प्रक्रिया :–**

साहित्यप्रवाह ही संकल्पना आधुनिक आहे. मराठी साहित्यात हा शब्दप्रयोग १९८० च्या आसपास ठळकपणे रुढ झाला अगोदर वस्तूचा जन्म होतो नंतर तिचे नामकरण आणि व्यवस्थापन होते. साहित्याच्या संदर्भात सांगायचे तर साहित्यनिर्मिती अगोदर आणि नंतर तिची संकल्पना, व्यवस्थापन असा स्वाभाविक क्रम असतो. प्रवाहनिर्मितीच्या बाबतीतही असाच क्रम असतो. समाजाचा जो विशिष्ट स्तर आजवर साहित्यनिर्मिती करीत असतो. त्याच्यापेक्षा वेगळा स्तर कालौघात विकास पावून तो ही साहित्य निर्मिती करु लागतो आणि त्या समाजात त्याचे साहित्य तोवरच्या साहित्य क्षेत्रात वेगळेपणाने उठून दिसते. लक्ष वेधून घेते. स्वतःचे अस्तित्व निर्माण करु पाहते.

१९७० ते १९९५ हा पंचवीस वर्षाचा काळ या साहित्य प्रवाहाच्या धामधुमीचा आणि उत्कर्षाचा होता. त्यांचे अनुभवविश्व तोपर्यंतच्या मराठी साहित्याला अनोळखी होते. ते धगधगते, अभिनिवेशयुक्त, आक्रमक स्वरुपाचे काहीसे घोषयुक्त त्यामुळे मानसिक दबाव आणणारे, पुर्वसुरींना धक्के देऊन बाजुला सारणारे, प्रस्थापितांना, त्यांच्या अपराधाची जाणीव करुन देणारे, निर्मितीचा ओघ तुडुंब भरुन वाहणारे होते. निर्मिती, तिची समीक्षा, तिचे समर्थन, तिचा उद्देश स्पष्ट करणारे होते. या काळात जवळजवळ सर्वच प्रमुख प्रवाहांची प्रतिष्ठाने, संमेलने, व्यासपीठे संस्था जन्माला आल्या नवतेच्या उत्साहाने हे प्रवाह क्रियाशील झालेले होते. पुर्वसुरींशी संघर्ष करत ते स्वतः स्थिर होऊ पाहत होते. प्रतिष्ठा प्रसिध्दी मिळवू पाहत होते. या पंचवीस वर्षाच्या काळात त्यांनी मराठी साहित्याचे स्वरुप पार बदलून टाकले.

एखादा साहित्यिक एखाद्या विशिष्ट समाजस्तरात जन्माला येतो. तिथे त्याचे बालपण गेलेले असते. ऐन पंचवीशीपर्यंतचे जीवन अनुभव त्यांना त्या समाजातच आलेले असतात. नंतर ते नोकरी निमित्त किंवा चरितार्थासाठी तो गाव तो समाज सोडून शहरात येतात आणि त्यांचे वेगळ्या पातळीवरचे जीवन सुरु होते. त्यांचा गाव त्यांचा समाज मागे पडतो. अशा परिस्थितीत तो साहित्यिक आपल्या पंचविशीपर्यंतचे अनुभव आपल्या साहित्यात मांडून रिता होतो. मग एक तर त्याची साहित्यनिर्मिती थांबते किंवा त्याच– त्याच प्रकारचे अनुभव तो पुनः पुन्हा लिहीत राहतो. त्यामुळे त्या प्रवाहातील कस किंवा ताकद निघून जाते. प्रवाहाची उंची वाढू शकत नाही. ही उंची वाढण्यासाठी त्या प्रवाहाची स्वीकृत विचारसरणी साहित्यिकाच्या अनुभव विश्वात सर्वांगांनी चांगली मुरलेली असावी लागते. ती त्याला मनापासून पटलेली असावी लागते. स्वतःच्या नजरेने समाज जीवन पाहताना त्याला वेळोवेळी प्रसंग घटनांतून, अनुभवांतून दैनंदिन जीवनातून त्या प्रणालीयुक्त विचारांचे पडताळे पदोपदी यावे लागतात. तरच ती विचारप्रणाली त्याच्या अनुभवविश्वाचा कणा होऊ शकते. तशी ती आलेली असेल तरच त्याच्या साहित्यकृतीच्या अनुभव घटकांतून ती झिरपू लागते. वाचकमनावर त्याचा परिणाम होतो आणि तो अपेक्षित दिशेने चिंतनाला प्रवृत्त होतो. साहित्यप्रवाहांना निर्माण होणाऱ्या या संभाव्य


Scanned by CamScanner

धोक्याची जाणीव ठेवूनच साहित्य प्रवाहातील निर्मिती ही अभ्यासपूर्वक वृत्तीने, पुरेशा गांभीर्याने, सर्जनशील सुजाणपणाने, परिपूर्ण मन:पूर्वकतेने दमदारपणे करावी लागते तशी ती झाली तरच साहित्य प्रवाह समृद्ध होऊ शकतात. या नियमाने ग्रामीण साहित्य प्रवाहाला समृद्ध करण्याचे काम डॉ. आनंद यादव यांनी केले.

सत्तरच्या दशकात मराठी साहित्य विश्वात अनेक उल्लेखनीय घडामोडी घडत होत्या. नवीन साहित्य प्रवाह मुसंडी मारुन प्रस्थापित साहित्य प्रवाहाला हादरा देत होते. दलित साहित्य प्रवाहापाठोपाठ ग्रामीण साहित्य प्रवाहाने उचल खाल्ली मात्र दलित साहित्य प्रवाहाप्रमाणे या लेखकांची भाषा आक्रमक नव्हती तर समन्वयाची होती. बघता बघता या प्रवाहाने चळवळीचे स्वरुप धारण केले. अनेक ठिकाणी कार्यशाळा, संमेलने घेतली जाऊ लागली अशी चळवळ निर्माण व्हावी आणि खेड्यापाड्यातील लेखकांनी आपल्या जीवनानुभवाचा आविष्कार आपल्या पद्धतीने आपल्या भाषेत करायला हवा असं वाटणाऱ्या लेखकांपैकी एक प्रमुख लेखक होते. डॉ. आनंद यादव त्यांनी 'गोतावळा' ही कादंबरी लिहून एक उदाहरण घालून दिले. पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर परिसरातील बोलीभाषेचा चपखल वापर करुन डॉ. आनंद यादव यांनी या कादंबरीतील नारबाचे आणि त्याच्या भावविश्वाचे अस्सल दर्शन घडवले. येऊ घातलेल्या यंत्रयुगामुळे कृषी संस्कृतीत तेथील मानवी जीवनात, शेतीशी संबंधीत प्राणीसृष्टीची कशी परवड होऊ घातली आहे याचे हृदयस्पर्शी चित्रण डॉ. यादव यांनी या कादंबरीत रेखाटले मराठी साहित्यामध्ये ग्रामीण साहित्य प्रवाहाची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यामध्ये डॉ. यादवांचे मोठे योगदान आहे. स्वातंत्र्यानंतरच्या दोन दशकांपर्यंत खेड्यात जन्मलेल्या लिहिणाऱ्या तरुणांना आत्मभान देण्याचे काम डॉ. यादव यांच्या नेतृत्वाखालील ग्रामीण साहित्य चळवळीने केले. ग्रामीण साहित्य प्रवाह आज मराठी साहित्यातला मध्यवर्ती प्रवाह बनला आहे. त्याचे नि:संशय श्रेय डॉ. आनंद यादव यांना जाते.

गेल्या पन्नास वर्षात सामाजिक स्थिती गति, परिस्थिती, प्रेरणा– प्रवृत्ती हळूहळू बदलत गेल्या. त्यांचा परिणाम होऊन साहित्यप्रवाह जन्माला आले. प्रवाह जन्माला आल्यानंतरही सामाजिक स्थितीगति परिस्थिती, प्रेरणा– प्रवृत्ती, टप्प्याटप्प्यांने बदलत असतात. अशावेळी त्यांचा वेध घेत साहित्य प्रवाहांना नवे वळण द्यावे लागते. पूर्वीचा टप्पा जो असतो. त्यातून बाहेर पडून नव्या टप्प्यावर नवा आशय नवी मांडणी जाणीवपुर्वक आत्मसात करण्याची गरज असते. त्यासाठी नवी साहित्यिक पिढी आस्थापूर्वक घडवावी लागते ती घडविली तरच नवे अनुभव नवी मांडणी प्रवाहांना लाभू शकते. हे झाले नाही तर प्रवाह आवर्तात सापडतात. तिथेच भोवरा करुन घोटाळत आणि केवळ विस्तारत राहतात. त्यांचा विकास खोळंबून राहतो. कोणत्याही प्रवाहाला हा धोका नेहमीच असतो. त्यामुळे प्रवाह निष्प्रभ होऊ शकतात. इतिहासगत होतात.

साहित्यप्रवाह एखाद्या समाजाच्या साहित्यात तत्कालीन विशिष्ट स्थितीत जन्माला येतात व ती स्थिती नष्ट झाली की, ते साहित्य प्रवाहही विसर्जित होतात हि संकल्पना एखाद्या विशिष्ट समाजातील सामाजिक साहित्यापुरतीच मर्यादित असते. त्या समाजाच्या साहित्यातही तो प्रवाह विशिष्ट काळात जन्माला आलेला असतो. तो नित्य स्वरुपात अस्तित्वात राहिलच याची शाश्वती नसते. कारण तो एक विशिष्ट सामाजिक परिस्थितीत जन्माला आलेला असतो. त्या विशिष्ट सामाजिक परिस्थितीचे अस्तित्व (सामाजिक परिवर्तन होऊन) संपुष्टात आले तर तो विशिष्ट साहित्य प्रवाहही त्या समाजाच्या मूळ साहित्य प्रवाहाशी एकजीव होऊन विसर्जित होतो. इतिहासजमा होतो. नंतरच्या काळात त्याचे अस्तित्व फक्त ऐतिहासिक स्वरुपात राहते पण म्हणून साहित्य प्रवाह कमी महत्त्वाचे आहेत असे मुळीच नाही. उदाहरणासाठी दलित साहित्य प्रवाह घेऊ.



Scanned by CamScanner

हा साहित्य प्रवाह १९७० च्या आसपास का जन्माला आला? तर त्या वेळच्या विशिष्ट सामाजिक स्थितीमुळे आपला समाज हा वर्ण व्यवस्थेवर व जाती व्यवस्थेवर आधारलेला आहे. या दोन्ही व्यवस्था आपल्या समाजात विषमतेवर आधारलेल्या आहेत. वर्ण व्यवस्थेत अतिशुद्रांचा वर्ण आणि जाती व्यवस्थेत अस्पृश्य जाती या सगळ्यात खालच्या मानल्या गेल्या आहेत. त्यांना गावकुसाबाहेर राहावे लागले. सर्व मानवी सुविधांपासून त्या शेकडो वर्षे वंचित आहेत. इतर वर्णांनी व जातींनी त्यांचे सर्वार्थाने शोषण केले. त्यांचे तसे शोषण करता यावे म्हणून त्यांना अज्ञानात ठेवले. ही आपल्या समाजातील एक वस्तुस्थिती आहे. हिंदू समाज व्यवस्थेच्या बाहेर अन्य कोणत्या समाजव्यवस्थेत ही वस्तुस्थिती अस्तित्वात नाही. या समाजात एका विशिष्ट काळात (म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या काळात) हा दलित समाज संघटित झाला. जागृत झाला. या काळातच आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले. लोकशाही आली, घटना तयार झाली. व्यक्तिस्वातंत्र्य मतदानाचा हक्क मिळाला, धर्मनिरपेक्षता आली. मागास जातींना शैक्षणिक व नोकरीतील सवलती मिळाल्या. दलित समाजाला या विशिष्ट काळात या सर्वांचे फायदे मिळाले. आणि या सर्वांचा एकत्रित परिणाम होऊन, विशिष्ट काळात दलित साहित्य प्रवाह जन्माला आला. जोपर्यंत दलित समाजावर कोणत्या ना कोणत्या स्वरुपात अन्याय करणारी किंवा त्यांचे शोषण करणारी प्रकृती वा स्थिती आपल्या समाजात अस्तित्वात आहे तोपर्यंत हा साहित्यप्रवाह वाहत राहणारच पण येत्या काही दशकांत ही समाजुस्थिती बदलेल असे अनेक कारणांनी वाटते. ही स्थिती बदलल्यावर दलित समाज एकूण समाजाशी एकात्म होऊन जाईल त्याला समतेने वागवले जाईल तो गावकुसाबाहेर 'अस्पृश्य' म्हणून राहणार नाही किंबहुना समाजातील एकूणच वर्ण, जाती ही नष्टप्राय, अस्तित्वशून्य होऊन जातील, तसे झाल्याने त्यांच्या पुढे तथाकथित दलिततत्वाचे अनुभव येऊ शकणार नाहीत. ते अनुभव ज्या दलित साहित्यप्रवाहाचे प्राणतत्व आहे. तो प्रवाहही त्यामुळे प्रवाहित राहणार नाही. कोणत्याही साहित्यप्रवाहाच्या बाबतीत कमी– अधिक फरकाने हेच सुत्र स्वीकारावे लागते.

**सारांश :–**

हे प्रवाह १९९० ते ९५ च्या आसपास स्थिर पावले काहीसे शांत धिम्याचालीचे झाले. ज्यांचे एकच एक दैवत होते. ज्यांनी विषयाची ठराविक सुत्रेच फक्त आत्मसात केली होती. जे श्रेयासाठी मतलबी होऊन इतरांपासून अलिप्त राहिले ज्यांनी साहित्याच्या स्वरुपाचा नीट अभ्यास केला नाही ज्यांनी तेच तेच साहित्य प्रकार त्याच त्या अभिनिवेशी पावित्र्याने एकसुरी मांडणीने हाताळले ते साहित्य प्रवाह काहीसे आवर्तात सापडले. जे धिम्या, दमदार गतीने चालत होते. प्राप्त काळातील सामाजिक बदला बरोबर सहप्रवास करत होते. ज्यांनी स्वतः बरोबरच नव्या दमदार तरुण पिढीलाही आस्थापूर्वक घडवण्याचा आणि साहित्यशिक्षण देण्याचा प्रयत्न केला तो प्रवाह दमदारपणे काळाबरोबर, बदलाबरोबर प्रवाहातच राहिले. प्रवाहाचा मूळ उर्जास्त्रोत दणकट व्यापक टिकाऊ आणि स्वयंसिद्ध असेल तरच प्रवाह आपले स्वतंत्र मार्ग काढू शकतो. स्वतंत्र अस्तित्व टिकवू शकतो.

**संदर्भ :**

१. डॉ. आनंद यादव (२००१), '१९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
२. डॉ. अंजली सोमण (२००६), 'साहित्य आणि सामाजिक संदर्भ', प्रतिमा प्रकाशन, पुणे.
३. किर्ती मुळीक (२०१८), 'डॉ. आनंद यादव एक साहित्यिक प्रवास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.



Scanned by CamScanner

COSMOS IMPACT FACTOR

Search

HOME · INDEXED JOURNAL · SUGGEST JOURNAL · REQUEST IF · DOWNLOAD LOGO · REVIEWER PANEL



Category
- INDEXED JOURNAL
- SUGGEST JOURNAL
- JOURNAL IF
- REQUEST FOR IF
- DOWNLOAD LOGO
- CONTACT US

SAMPLE CERTIFICATE

SAMPLE EVALUATION SHEET

## Journal Detail

| | |
|---|---|
| Journal Name | RESEARCH JOURNEY |
| ISSN/EISSN | 2348-7143 |
| Country | IN |
| Frequency | Quarterly |
| Journal Discipline | General Science |
| Year of First Publication | 2014 |
| Web Site | www.researchjourney.net |
| Editor | Prof. Dhanraj Dhangar & Prof. Gajanan Wankhede |
| Indexed | Yes |
| Email | researchjourney2014@gmail.com |
| Phone No. | +91 7709752380 |
| Cosmos Impact Factor | **2015 : 3.452** |

GIF GLOBAL IMPACT FACTOR

Institute for Information Resources

News Updates Now Annual membership fee is of just 40 Dollars for existing members and they can renew their membership for year 2016




**Get Involved**
- Home
- Evaluation Method
- Journal List
- Apply for Evaluation/Free Service
- Journal Search

**Recently Added Journals**

| Research Journey | |
|---|---|
| ISSN | 2348-7143 |
| Country | India |
| Frequency | Quarterly |
| Year publication | 2014-2015 |
| Website | researchjournev.net |
| Global impact and Quality Factor | |
| 2014 | 0.565 |
| 2015 | 0.676 |

TOGETHER WE REACH THE GOAL



**SJIF Evaluation on Request**
The Editorial Staff who decide to use of this option will receive the SJIF Impact Factor within 7 days.

**SJIF Publishers Panel**
Register journal - (Free Service) in a scored and prestigious database of scientific journals.
Manage journal - (Free Service) This section allows you to place information about the journal, editors, and publisher etc.

**SJIF Journal Rank**
Full list of journals from database of SJIFactor.com. It contains currently over **20000 journals** from all over the world.

**Logo**
SJIF logo clearly shows that the Journal is indexed in our database.

**Certificate**
A proof of being indexed in SJIF Journal Rank List.

Evaluation methodology
FAQ

Research Journey

**SJIF 2016:**
Under evaluation
Area: Multidisciplinary
Evaluated version: online

Previous evaluation SJIF
2015: Not indexed
2014: 3.009
2013: Not indexed
2012: Not indexed

**The journal is indexed in:**
SJIFactor.com - SJIF Scientific Journal Impact Factor

**Basic information**

| | |
|---|---|
| Main title | Research Journey |
| Other title [English] | Research Journey |
| Abbreviated title | |
| ISSN | 2348-7143 (E) |
| URL | http://WWW.RESEARCHJOURNEY.NET |
| Country | India |
| Journal's character | Scientific |
| Frequency | Quarterly |
| License | Free for educational use |
| Texts availability | Free |

**Contact Details**

| | |
|---|---|
| Editor-in-chief | Prof. Dhanraj Dhangar<br>M.G.V.'S ARTS & COMMERCE COLLEGE YEOLA, DIST NASHIK<br>India |
| Publisher | MRS. SWATI SONAWANE |

SWATIDHAN PUBLICATIONS

**For Details Visit To : www.researchjourney.net**

**Price : Rs. 800/-**

Scanned by CamScanner